Sec.3.4.1(L) 31st October 2025

The Secretary,
**BSE Ltd.,**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai 400 001
**BSE Scrip Code: 500547**

The Secretary,
**National Stock Exchange of India Ltd.,**
Exchange Plaza, Plot No C/1,
G Block, Bandra-Kurla Complex,
Mumbai 400051
**NSE Symbol : BPCL**

Dear Sir/Madam,

**Sub: Intimation under Regulation 30 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements), Regulations, 2015 - Newspaper Advertisement**

In terms of Regulation 30 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements), Regulations, 2015 and in continuation to our notice dated July 09, 2025, we enclose herewith copies of the notice to shareholders published in the newspapers i.e. in Times of India (all editions) and in Maharashtra Times on 31st October, 2025 intimating about the opening of a special window for re-lodgement of transfer requests for physical shares, which were lodged prior to the deadline of 1st April 2019 and rejected/returned/not attended due to the deficiency in the documents/process/or otherwise, in accordance with SEBI Circular No. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 dated 2nd July, 2025.

All such re-lodgements with legally valid and complete documentation, where there is no dispute on ownership shall be considered. The above information is also available on the website of the Company at https://www.bharatpetroleum.in/bharat-petroleum-for/investors/procedure-related-to-investor-service-requests/special-window-for-re-lodgement-of-transfer .

This is for your information.

Thanking You,

Yours Faithfully,
For Bharat Petroleum Corporation Limited
KALA VAIDYANATHAN
Digitally signed by KALA VAIDYANATHAN
Date: 2025.10.31 16:17:29 +05'30'
(V. Kala)
Company Secretary

# Sanction for Jain trust land redevpt revoked

Anurag.Bende
@timesofindia.com



**DEED TO BE CANCELLED:** Members of the Jain community celebrate

**Pune:** Maharashtra state charity commissioner Amogh Kaloti Thursday passed an order revoking April 4, 2025, sanction to redevelop 3.5-acre property owned by Seth Hirachand Nemchand Smarak Trust in Model Colony. The order allowed trustees and Gokhale Landmarks LLP to initiate the cancellation of the sale deed and the power of attorney. Kaloti also directed the trust to refund Rs 230 crore to the developer once the sale deed is cancelled.

The deal landed in controversy after the Jain community objected to the trust's decision, leading to two weeks of protests. A hostel and a Jain temple/prayer hall stand on the premises. Following a call by Jain religious leader Acharya Guptinandi Maharaj threatening an indefinite hunger strike from Nov 1 if the agreement was not scrapped, both the trust and developer informed the charity commissioner of their intentions to withdraw from the deal.

# China OKs supply of rare earth magnets to 'some Indian cos'

## Nod Comes With Riders: No-Export To US, No-Use For Def Industries

TIMES NEWS NETWORK



In this Oct 14 photo, a sample of bastnaesite ore, a mineral used in the rare earth industry to extract elements, is displayed at Geological Museum of China in Beijing

**New Delhi:** Govt Thursday said "some Indian companies" have got approval from China to import rare earth magnets from the country to be used in the automotive and electronics industries.

MEA spokesperson Randhir Jaiswal said licences have been issued to the companies, which will enable them to get access to the magnets whose procurement had been stopped after China put curbs on their sale earlier this year.

The curbs have impacted the production of automobiles, especially electric cars and two-wheelers with companies petitioning govt to take up the matter with China.

"Yes, we confirm that some Indian companies have received licences for importing rare earth magnets from China," Jaiswal said while responding to questions on the matter.

"As far as the question of the latest talks and relaxations that have happened between the US and China (and) as to how it is going to play into our domain, I will come back to you. We have yet to look at it. I am not aware of the technicalities. But we will come back to you. But I do confirm that Indian companies have received licences for importing rare earths from China," he said.

Jaiswal, however, did not give details of the companies that have received permission. Industry sources said the companies include those that supply components to the automotive and electronics industries.

However, the imports come with certain restrictions. These include conditions that the magnets cannot be exported to the US, and cannot be used for defence-related industries.

Rare earth magnets are the strongest type of permanent magnets commercially available. Their high magnetic strength and resistance to demagnetisation make them indispensable in a range of applications, especially where weight and space are constraints.

China is estimated to account for about 70% of global rare earth metals mining and holds nearly 90% of the world's rare earth magnet's production.

One of the reasons China dominates the rare earth magnet industry is its control over the supply chain, including mining of rare earth ores, separation and refining of rare earth elements, and alloy production and magnet manufacturing. Just in the Indian auto industry alone, about 870 tonnes of rare earth magnets are required to be imported in FY 2025-26 out of the country's estimated overall requirement of 3,600 tonnes.

# Couple serving life term for murder gets parole for IVF after 15 yrs in jail

TIMES NEWS NETWORK

**Ahmedabad:** Fifteen years of separation. A shared sentence. Now, a Gujarat high court order offered a rare pause to a couple convicted of murdering the woman's former boyfriend in 2010 — a chance to create life, even while serving time for taking one.

Jayendra Damor and Sejal Bariya have been granted extended parole to undergo in-vitro fertilisation (IVF) treatment, marking a rare judicial allowance for imprisoned convicts seeking parenthood. Damor and Bariya, both serving life terms in separate prisons for the killing of Pinakin Patel, are out on parole until Nov 2, following the HC order that described their plea as deserving of "sympathetic consideration". The two were convicted by a Godhra district court in 2013 for conspiring to lure Patel — who allegedly continued to harass Bariya after their breakup — to a guesthouse, where he was murdered. At the time, Bariya was a PTC college student in Rajkot and in a relationship with Damor.



Now in their late thirties, the couple told the court they wished to have a child through IVF, for which they required ongoing medical supervision. Bariya was first released on parole in 2023 for infertility treatment and began consulting a gynaecologist. Based on her medical reports, Damor later sought parole for himself, citing the need to participate in the procedure.

On Oct 16, HC granted Damor temporary release to accompany Bariya, who had already been freed by jail authorities for her ongoing treatment. When the couple appeared before the court again on Oct 28, Justice HD Suthar agreed to extend the parole period.

"Having regard to the facts and circumstances and for the reasons stated in the application, the same is partly allowed and the parole leave period...is extended up to Nov 2, 2025, on the same terms and conditions," HC said. The bench, however, drew a clear line on leniency: "The applicant shall surrender before the concerned jail authority immediately after the aforesaid period is over. No further extension shall be granted."

# 'Will continue to buy energy from affordable sources'

TIMES NEWS NETWORK

**New Delhi:** As the US targets Russia by sanctioning some of its largest oil companies, Indian govt said Thursday it's studying the implications of the sanctions and will consider "evolving dynamics" of the global market. It also reiterated India will continue to secure affordable energy from diverse sources.

Without sharing much details about the status of the ongoing negotiations with the US for a trade deal, the govt said India remained engaged with Washington for finalising the agreement. "We are studying the implications of the recent US sanctions on Russian oil companies. Our decisions naturally take into account the evolving dynamics of the global market," said MEA spokesperson **Randhir Jaiswal**.



"Our position on the larger question of energy sourcing is well known. In this endeavour, we are guided by the imperative to secure affordable energy from diverse sources to meet the energy security needs of our 1.4 billion people," added the official. This was the first official Indian response to sanctions that the US imposed on Russian oil companies citing Moscow's "lack of serious commitment to a peace process to end the war in Ukraine". The sanctions targeted Russia's two largest oil companies, Open Joint Stock Company Rosneft Oil Company (Rosneft) and Public Joint-Stock Company Oil Company Lukoil (Lukoil). Rosneft has a 49% stake in India's Nayara Energy, which is under sanctions from both the US and the EU.

In reply to a separate question about PM Modi's conversation this week with his Japanese counterpart Sanae Takaichi, the govt backed Quad calling it a valuable forum for discussion on shared interests in a number of areas but remained non-committal on dates for the Quad summit that India as to host.

## SC shifts Punjab hit-&-run trial to Delhi court

**New Delhi:** The Supreme Court on Thursday transferred the trial in a hit-and-run case involving death of a motorcyclist from Phagwara in Punjab to Rohini courts in Delhi after his widow expressed apprehensions over fairness of the trial in a state where the accused is a probation judicial officer.

However, the bench acceded to the request from the counsel for the judicial officer to exempt him from personal appearance after he undertook that he would have no objection if the Delhi court recorded the statements of witnesses in the presence of his counsel, who shall mandatorily attend the proceedings on every scheduled date of hearing without fail.

The SC asked the accused to mark his attendance before the Rohini court through video conferencing and told him that under no circumstances should his counsel seek adjournment of trial proceedings. TNN

# NHAI simplifies process to complete KYV for FASTags

Dipak.Dash@timesofindia.com

**New Delhi:** A day after the **TOI** report on the problems faced by vehicle owners to complete the Know Your Vehicle (KYV) process for FASTags, National Highways Authority of India (NHAI) on Thursday simplified the process. Under the revised guidelines, FASTag services won't be stopped for non-compliant vehicles and users will get sufficient opportunity to complete the process.

"Under the simplified KYV guidelines, side photographs of car, jeep or van will no longer be required. Only the front picture showing the number plate and FASTag will be required to be uploaded. Also, provisions will be made to automatically fetch RC details from Vahan database," said an official statement issued by the road transport ministry.

Govt also said that to maintain continuation of services, FASTags issued before the KYV policy (issued on June 20, 2024) will remain active unless complaints are received for loose tags or misuse.

TOI IMPACT




In addition, issuer banks will send SMS reminders to users to complete KYV. It added that in case a user faces difficulty in uploading documents, the issuing bank will contact customers to assist in completing the process.

Officials said customers can also lodge complaints or raise queries on the NH helpline number 1033 for any KYV related issues.

**TOI** in its report published Wednesday highlighted difficulties faced by vehicle owners in uploading documents for FASTag verification.

## Bogus call centre case: Accused arrested in Goa

**Chhatrapati Sambhajinagar:** Police arrested Abdul Farooq Mukadam Shah, alias Farooqi, the "second-in-command" in the bogus call centre racket, from Goa on Wednesday night. Shah was produced before a court on Thursday morning. The court remanded him in police custody till Nov 8, reports **Mohammed Akhef**.

The racket was unearthed on Tuesday after the Chhatrapati Sambhajinagar police raided a bogus call centre operating under the guise of a legitimate business in Chikalthana's MIDC Cidco. The staffers at this fake call centre allegedly duped several US citizens by posing as officials of the US Internal Revenue Service.

# After 5 years in jail, woman acquitted of killing 7-yr-old

Barinderjit.Saluja@timesofindia.com

**Mohali:** After spending nearly five years in jail, a woman accused of murdering a seven-year-old boy was acquitted by a Mohali court on Thursday, which said the prosecution had failed to establish motive, connect evidence, or prove murder beyond reasonable doubt.

Amandeep Kaur, a resident of Gharuan village, remained in judicial custody for four years, eight months and 12 days as no one came forward to stand surety for the woman's bail, her counsel C S Bawa said.



"The entire evidence leads this court to an inference that the deceased might have died accidentally. The suspicion, however grave, cannot take the place of cogent proof," the court said, acquitting Amandeep of all charges. The court emphasised adherence to the 'Panchsheel principle' of circumstantial evidence, which requires that all circumstances must be fully established and form a complete chain pointing only to the guilt of the accused.

The court said that while the evidence suggested the boy may have drowned in the water drum found in the accused's house, there was nothing to show that the drowning was intentional or that Amandeep was responsible. "The evidence on record proves that on the date of occurrence, the deceased went to the house of the accused. But what happened inside that house was never proved by the prosecution. There is no eyewitness in the case, and the circumstantial evidence is insufficient to conclude that Amandeep Kaur caused the boy's death," the court stated.

The prosecution's case was riddled with inconsistencies and missing links, the court found.

Bawa added that 21 witnesses were examined during the trial, but none could corroborate the prosecution's version of events.

# Aizawl to hand out slingshots to deter strays

HC Vanlalruata | TNN

**Aizawl:** Khatla South local council in Aizawl has announced plans to distribute slingshots to residents in a bid to deter dogs from roaming the streets unattended. Council chairman PL Liandinga said the decision was made after previous appeals yielded no results.

"Dogs can be dangerous while canine faeces along the streets and neighbours' premises can be unhygienic," Liandinga said. He added while some dog owners responsibly walked their pets and cleaned up after them, others allowed their dogs to roam freely, contributing to the problem. Dog bite is also a concern, with Civil Hospital in the Mizoram capital treating 10 cases over the past three days.

Animal rights activists, however, expressed opposition to the plan. Activist and singer C Luri said pet owners should be held accountable, not the canines.

"Hitting dogs with catapults is an offence under Prevention of Cruelty to Animals Act, 1960," said Julie Khiangte, an animal rights activist. Supreme Court recently directed stray dogs be caught, vaccinated, sterilised, and returned to their neighbourhoods.

## Strays case: SC nixes Bihar chief secy's plea

Bihar chief secretary on Thursday sought exemption from personal appearance in the stray dog menace case citing assembly polls, but SC rejected his plea. "Chief secretary has nothing to do with elections and the Election Commission is there to take care of it," the bench said. TNN

TIMES ascent
www.timesascent.com
Catapult your career

भारतीय प्रबन्धन संस्थान तिरुचिरापल्ली
Indian Institute of Management Tiruchirappalli

RECRUITMENT NOTIFICATION-SPECIAL DRIVE FOR FACULTY
Advertisement No.: EST-I/A-02/2025/SD-1 dated 31.10.2025

Indian Institute of Management Tiruchirappalli invites online applications from interested candidates belonging to **SC/ST/OBC-NCL/EWS/PwBD** categories only for the following Faculty positions on or before **21.11.2025.**

- Professor
- Associate Professor
- Assistant Professor – Grade I

For full details regarding positions, qualifications, experience, terms & conditions, and other requirements, please visit our website: https://www.iimtrichy.ac.in/careers

इस विज्ञापन की पूर्ण जानकारी के लिए कृपया उपरोक्त वेबसाइट देखें ।

MPMETRO
MADHYA PRADESH METRO RAIL CORPORATION LIMITED
(A Joint Venture of Govt. of India and Govt. of Madhya Pradesh)
Admin Building, Subhash Nagar Metro Rail Depot, Bhopal, Madhya Pradesh-462023

ADVERTISEMENT FOR RECRUITMENT

Madhya Pradesh Metro Rail Corporation Limited (MPMRCL), a joint venture of Government of India and Government of Madhya Pradesh is implementing Bhopal Metro Rail Project & Indore Metro Rail Project in the State of Madhya Pradesh. To meet with the immediate requirement, MPMRCL invites applications for the post of

MANAGER/ASSISTANT MANAGER (E&M)
ASSISTANT MANAGER (ROLLING STOCK)
ASSISTANT MANAGER (TELECOMMUNICATIONS)

This Advertisement is only indicative. The detailed vacancy notifications and particulars regarding eligibility criteria, qualification, experience, age limit, mode of selection etc. are available, in the Career sections of MPMRCL website **www.mpmetrorail.com**. Please refer Advt. No. 4065/HRD/MPMRCL-074/2025, dated 29.10.2025 for more details.
Last date for submission of online applications for the notifications is **30.11.2025**.
M.P. Madhyam/122745/2025 MD, MPMRCL

Devharsh Infotech Private Limited
IBA Approved Security Printers & Solution Providers

HIRING IN SALES

If you are ready to take up a challenging position in a growing & diversified organization and if you have 3-8 years of experience in sales, then apply for Sales Executive/Sr. Sales Executive in following fields.

- **Software** (Job Code: SS01)
- **Security Printing** (Job Code: SP01)
- **Airlines & Travel Documents** (Job Code: ATD01)
- **Drones & Drone-based Solutions** (Job Code: DBS01)
- **ID Cards & Smart Cards** (Job Code: IDSC01)
- **Labels & Packaging Materials** (Job Code: LPM01)
- **Marketing & Sales Manager** (Job Code: MSM01)

• Remuneration at par with industry with attractive perks.
• Relevant field experience will be preferred.

Check our website for more details www.devharshinfotech.com
Send your job application to info@devharshinfotech.com and mention the job code in the subject line. In case you need more details, contact-022 2578 4858/9867801667 or check the career page on our website.

PTC India Limited
CIN: L40105DL1999PLC099328
Regd. Office : 2nd Floor, NBCC Tower, 15, Bhikaji Cama Place, New Delhi-110066

PTC India Ltd. invites applications for the position of
EXECUTIVE DIRECTOR
(BD & CONSULTANCY)

Last date for submission of application is
15TH December, 2025
For more information, log on to **www.ptcindia.com**

TIMES ascent global
Catapult your career

Ministry of Health QATAR Government Hospital is Hiring for Health Information Communication Technology (HICT)
FACE-TO-FACE INTERVIEWS IN BANGALORE ON 12TH & 13TH NOV. 2025
FREE & DIRECT RECRUITMENT
ENTERPRISE & CLOUD ARCHITECTURE : ♦ SR. SME - ENTERPRISE ARCHITECT ♦ SR. SME - CLOUD ARCHITECT ♦ HICT SPECIALIST - CLOUD SPECIALIST
APPLICATION & SYSTEMS INTEGRATION : ♦ SR. SME - ORACLE FUSION SOLUTION ARCHITECT ♦ CERNER SPECIALIST ♦ SR. SME - CERNER SPECIALIST ♦ INTERFACE SPECIALIST
AI, DATA & MACHINE LEARNING : ♦ SR. SME - AI & DATA / ML ENGINEER ♦ DATABASE MANAGEMENT & SERVICE MANAGEMENT SPECIALIST
Bachelor's Degree in Computer Science / Computer Engineering / Information Systems / Electronics or related field to IT industry with relevant professional certifications and min. 9+ years experience.
Email your updated CV with documents to: hict@jesseena.com
Desired experience in Healthcare / Hospital field | Cerner & Oracle certified candidates preferred
Jesseena Marine Services Pvt. Ltd. (AN ISO 9001–2015 Certified Company)
608, Nirmal Ecstacy Business Park, 6th Floor, JSD Road, Mulund West, Nr. Mulund Rlwy Stn / Flyover, Mumbai - 400080.
Mobile / WhatsApp: 9867937297 / 9004621199
Lic No.: B-678/MUM/COM/1000+/5/4871/97 • Apply on www.jesseena.com

ALL INDIA INSTITUTE OF MEDICAL SCIENCES
Mangalagiri, Guntur District
Andhra Pradesh - 522503
[Advt No. AIIMS/MG/Admin/Recruitment/03/Faculty/2025/03 dtd. 23/10/2025]
ADVERTISEMENT FOR RECRUITMENT OF FACULTY POSTS (GROUP 'A') IN VARIOUS DEPARTMENTS OF AIIMS MANGALAGIRI ON DIRECT RECRUITMENT BASIS
AIIMS Mangalagiri invites Online applications from eligible candidates for 07 FACULTY POSTS (GROUP 'A') IN VARIOUS DEPARTMENTS. The cut-off date for this advertisement will be 30 days from the date of publication of the advertisement in the Employment News/ Rojgar Samachar. For more details, please visit website www.aiimsmangalagiri.edu.in.
Sd/-
Executive Director
AIIMS, Mangalagiri




Bharat Petroleum Corporation Limited
(A Govt. of India Enterprise)
Regd. Office: Bharat Bhavan, 4 & 6 Currimbhoy Road, Ballard Estate, Mumbai-400 001
Phone: 2271 3000/4000,
Email: info@bharatpetroleum.in, Website: www.bharatpetroleum.in
CIN - L23220MH1952GOI008931

SPECIAL WINDOW FOR RE-LODGEMENT OF TRANSFER REQUESTS OF PHYSICAL SHARES

In continuation to our intimation dated July 09, 2025, notice is hereby given that pursuant to SEBI circular dated July 02, 2025,the Company has opened a special window exclusively for the re-lodgement of transfer deeds, which were lodged prior to the deadline of April 01, 2019 and rejected/returned/not attended due to the deficiency in the documents/process/or otherwise.The special window will remain open upto January 06, 2026, and all such transfers shall be processed only in demat mode.
Investors may submit their request with our Registrar and Share Transfer Agent ("RTA"), at M/s KFin Technologies Limited, Selenium Tower B, Plot 31 & 32, Financial District,Nanakramguda, Hyderabad - 500 032; Toll free number:1800 309 4001; email: **einward.ris@kfintech.com** till January 06, 2026.
Investors must have a demat account and provide its Client Master List, along with the transfer documents and share certificate, while re-lodging the transfer request with RTA. Due process shall be followed for such transfer-cum-demat requests. **All such re-lodgements with legally valid and complete documentation, where there is no dispute on ownership shall be considered.**

For Bharat Petroleum Corporation Ltd.
Sd/-
(V. Kala)
Company Secretary
Date: 30.10.2025
Place: Mumbai

Bharatgas | MAK LUBRICANTS | Bharat Petroleum Aviation Service
Energising Lives, Energising Naya Bharat

BIRBAL SAHNI INSTITUTE OF PALAEOSCIENCES
(An Autonomous Institution under Department of Science & Technology, Govt. of India)
53, UNIVERSITY ROAD, LUCKNOW - 226007 (U.P.) INDIA
Fax: 0522-2740098/2740485, Website : www.bsip.res.in

ADVERTISEMENT NO. BSIP/PS/2025 Dated: 31.10.2025

Online applications are invited from eligible Indian citizens for appointment of the following regular post in the Institute:-

| Sl. No. | Name of the Post | No. of Vacancies | | | | | | Pay Level (As per 7th Central Pay Commission) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | EWS | UR | ST | SC | OBC | Total Post | |
| A. | Private Secretary | - | 01 | - | - | - | 01 | Pay Level-07 |
| | Total Post | - | 01 | - | - | - | 01 | |

The detailed Notice for the above post, including educational qualifications, age limits, commencement of online registration, last date for submission of application, application fee, etc. is available on our website **www.bsip.res.in**. Interested Candidates can download the details and apply "**ON-LINE**" Only through "bsiprecruitment portal" under "Career" section of the Institute's website i.e. **www.bsip.res.in**. No other means/mode of application will be accepted.
The Institute reserve the right to alter/insert any corrections/additions in the advertisement/ website in the event of any typographical error before the last date prescribed for the receipt of applications.
REGISTRAR

CCI NG 3.7 Product: MTMumbaiBS PubDate: 31-10-2025 Zone: Mumbai Edition: 1 Page: MTMP9 User: amit.patil2 Time: 10-30-2025 23:04 Color:



# प्रशासकांची शाळा

डॉ. भावना पाटोळे
mtedit@timesofindia.com




**अखिल भारतीय नागरी सेवांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व वाढावे, या हेतूने २६ ऑक्टोबर १९७६ रोजी मुंबईत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेची ('एस.आय.एस.सी') स्थापना करण्यात आली. पन्नाशीत प्रवेश केलेल्या या संस्थेच्या स्थापनादिनानिमित्ताने संस्थेच्या यशोगाथेचा आढावा…**

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था ही महाराष्ट्रीय तरुणांना लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणारी व प्रशिक्षण देणारी संस्था आहे. अखिल भारतीय सेवांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व कमी होत असल्याची दखल घेऊन, राज्यातील अधिकाऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राने पुढाकार घेतला. याच दृष्टिकोनातून २६ ऑक्टोबर १९७६ रोजी मुंबईत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातील होतकरू विद्यार्थ्यांना आयएएस, आयपीएस आणि इतर केंद्रीय लोकसेवा आयोजित स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याची संधी मिळावी आणि राज्याचे प्रतिनिधित्व मजबूत व्हावे, हा संस्थेच्या स्थापनेमागील हेतू होता. राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था 'एस.आय.एस.सी' म्हणून प्रचलित आहे. या संस्थेच्या कार्यप्रेरणेने १९८५ मध्ये नागपूर, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे, तर २०१३ मध्ये अमरावती आणि नाशिक येथे भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांची उभारणी करण्यात आली.

महाराष्ट्रातील दुर्गम खेड्यापाड्यांमधूनही विद्यार्थी आपल्या स्वप्नांना आकार देण्यासाठी येथे येऊ लागले. सुरुवातीला नागरी सेवा प्रशिक्षणाचा कालावधी फक्त दोन-तीन महिन्यांचा असला, तरी विद्यार्थ्यांचा वाढत्या उत्साह आणि गरज ओळखून वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी उपस्थितीनुसार विद्यावेतन, वसतिगृह, ग्रंथालय आणि अभ्यासिका यांसारख्या सोयी सुरुवातीपासूनच उपलब्ध करून देण्यात आल्या. संस्थेत कम्प्युटर कक्षाची स्थापना करण्यात आली आणि इंटरनेट सेवेला प्रारंभ झाला. संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी संस्थेतील वसतिगृह तसेच चर्चगेट, मातोश्री शासकीय मुलांचे वसतिगृह उपलब्ध केले जाते. मुलींसाठी तेलंग स्मृती मुलींचे वसतिगृह चर्चगेट येथे निशुल्क सोयीसह उपलब्ध आहे. पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुख्य परीक्षेकरता प्रवेश दिला जातो. प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना निशुल्क सरावसंच रक्कम देण्याची तरतूद शासन स्तरावर केलेली आहे.

या संस्थेत येणारे विद्यार्थी विविध विद्याशाखांमध्ये पदवीधर असतात. प्रशिक्षणामध्ये नागरी सेवा परीक्षा अभ्यासक्रमानुसार विषयवार व्याख्याने, चर्चासत्रे आणि सराव परीक्षा घेतल्या जातात. वरिष्ठ अधिकारी आणि निवड झालेल्या माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळते. मुख्य परीक्षेपूर्वी मुलाखतपूर्व कार्यक्रमही आयोजित केला जातो. महाराष्ट्र शासनामार्फत दिल्ली येथे आयोजित केलेला अभिरूप मुलाखत उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि उपयुक्त उपक्रम मानला जातो. गुणवत्ताधारित शिष्यवृत्ती योजना भाग १ आणि भाग २ महाराष्ट्र शासनामार्फत राबवली जाते. मागील तीन वर्षांमध्ये किमान एकदा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचलेले, परंतु अंतिम निवड न झालेल्या उमेदवारांना या योजनेअंतर्गत अर्ज करता येतो. अशा उमेदवारांना पुढील तयारीसाठी दिल्ली येथील नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढवणे हाच या दिल्ली शिष्यवृत्ती योजनेचा मुख्य उद्देश आहे. या वर्षासाठी गुणवत्ताधारित शिष्यवृत्ती योजनेबाबतची माहिती लवकरच एस.आय.ए.सी.च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल.

स्पर्धा परीक्षा ही सोपी किंवा सहजसाध्य गोष्ट नसली तरी ती अशक्यही नाही. नागरी सेवा परीक्षा ही अनेक बाबतीत इतर परीक्षांपेक्षा वेगळी आहे. या परीक्षेत विषयाची सखोल मांडणी स्वतःच्या पद्धतीने करता येणे महत्त्वाचे असते. बऱ्याच विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून नागरी सेवा परीक्षा देण्यासाठी संस्थेमार्फत प्रोत्साहन देण्यात आले. या प्रयत्नांमुळे पूर्व परीक्षेत २५ पैकी २४ विद्यार्थी उत्तीर्ण होण्याचा मान संस्थेला मिळाला. मराठी वाङ्मय आणि इतिहास या विषयांना लोकप्रिय बनविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण झाली. महाराष्ट्रातून यूपीएससी परीक्षेत यश मिळवणारे सुमारे ७० टक्के विद्यार्थी हे एस.आय.ए.सी.चे विद्यार्थी राहिले आहेत, ही बाब संस्थेच्या कार्याचा प्रभाव आणि परिणाम अधोरेखित करते. पाच दशकांच्या प्रवासात संस्थेने पाच हजारहून अधिक विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण देत त्यांच्या स्वप्नांना दिशा दिली आहे. आज या प्रवासाचे फलित म्हणून एक हजारहून अधिक विद्यार्थी अखिल भारतीय सेवांमध्ये कार्यरत राहून संस्थेच्या यशोगाथेला तेज देत आहेत.

सन २०२४ साठी मान्यवर अधिकारीवर्गाच्या सहाय्याने निशुल्क अभिरूप (मॉक) मुलाखत कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यूपीएससी २०२५ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १० मे २०२५ रोजी आयोजित केलेल्या सराव परीक्षेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. एस.आय.एस.सी.चे ९७ विद्यार्थी २०२५च्या यूपीएससी मुख्य परीक्षेत सहभागी झाले, ही विशेष नोंद घेण्यासारखी गोष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी Quality Enrichment Programme अंतर्गत विविध विषयांवर सत्रे घेण्यात आली. सन २०२५ मध्ये प्रथमच इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस (आयएफएस) परीक्षेसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या आहेत. तसेच २०२५च्या मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे २०२६ साठी आयोजित नागरी पूर्व परीक्षा (प्रीलिम्स) साठी प्रशिक्षणार्थींना प्रवेश देण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यात आली. सर्व प्री-आयएएस प्रशिक्षण केंद्रे, यशदा आणि सावित्रीबाई फुले अकादमी यांची २७ जुलै २०२५ रोजी एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) यशस्वीपणे पार पडली. या प्रक्रियेचे नियोजन व मार्गदर्शन नोडल अधिकारी म्हणून मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेचे संचालक करीत आहेत. प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यानुसार, २०२६च्या यूपीएससी बॅचसाठी मार्गदर्शन वर्ग सुरू होणार आहेत.

सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करण्याच्या दिशेने एस.आय.ए.सी.ची वाटचाल सुरू आहे. राजधानी मुंबईत झालेली संस्थेची स्थापना केवळ ऐतिहासिक टप्पा ठरली नाही, तर तिने राज्यातील नागरी सेवा तयारीला कलाटणी देऊन पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी संघ लोकसेवा परीक्षांमध्ये यश मिळवले असून, तिचा प्रभाव आजही देशातील नागरी सेवा क्षेत्रात तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पष्टपणे जाणवतो. एस.आय.ए.सी.मधून प्रशिक्षण घेऊन यूपीएससी उत्तीर्ण झालेल्या अनेक गुणवान आय.ए. एस आणि भारतीय पोलिस सेवा अधिकाऱ्यांची फौज शासनाच्या विविध विभागांमध्ये कार्यरत आहे. राज्याचे माजी मुख्य सचिव ,सहाव्या राज्य वित्त आयोगाच्या पदी नियुक्त डॉ. नितीन करीर, मुंबई हल्ल्यादरम्यान दहशतवादविरोधी कारवायांमध्ये योगदान देणारे धैर्यशील अधिकारी, मानवी तस्करीविरोधी कार्यात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाकडून गौरवाचा पुरस्कार प्राप्त अधिकारी, 'पासपोर्ट मॅन'पासून 'मेट्रो वूमन' पर्यंत समाजाला योगदान देणारे कर्तृत्वशील अधिकारी हे माजी विद्यार्थी एस.आय.ए.सी.साठी गौरवाचे प्रतीक ठरले आहेत. संघ लोकसेवा आयोगाच्या अंतिम परीक्षेत तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले डॉ. भूषण गगराणी हे संस्थेसाठी गौरवाचे प्रतीक आहेत. ते सध्या महानगरपालिका आयुक्तपदी कार्यरत आहेत. एस.आय.ए.सी.च्या योगदानाबाबत बोलताना ते म्हणतात, 'मला घडवण्यामध्ये एस.आय.एस.सी इतका संस्थात्मक वाटा कोणाचाच नाही. एस.आय.एस.सीने केवळ स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शनच नव्हे तर मला एक आत्मविश्वास दिला, दिशा दिली आणि अनेक मित्रपण दिले! मी संस्थेचा कायमच ऋणी राहीन.'राजधानी मुंबईत झालेली संस्थेची स्थापना केवळ ऐतिहासिक टप्पा ठरली नाही, तर तिने राज्यातील नागरी सेवा तयारीला एक कलाटणी दिली. यूपीएससी शताब्दी वर्ष साजरे करण्याच्या दिशेने पावले टाकत असताना, देशातील यूपीएससी प्रशिक्षण संस्थांमध्ये एस.आय.ए.सी.ची कामगिरी सर्वोत्तम ठरावी, अशी अभिमानास्पद परंपरा संस्थेने निर्माण केली आहे, हे नमूद करावे लागेल.

**(लेखिका राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्थेच्या संचालक आहेत.)**

# सहकारातील त्रिवेणी संगम

वैशाली विवेकानंद फडणीस
mtedit@timesofindia.com

**विठ्ठलराव विखे पाटील यांची नि:स्वार्थ सेवा, डॉ. धनंजय गाडगीळ यांचे बुद्धिमत्तेचे नियोजन आणि वैकुंठभाई मेहता यांची नैतिक शिस्त हाच महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा त्रिवेणी संगम आहे. वैकुंठभाई मेहता यांची जयंती नुकतीच झाली. त्या निमित्ताने…**


डॉ. धनंजयराव गाडगीळ


वैकुंठभाई मेहता



विठ्ठलराव विखे पाटील

'सहकार म्हणजे फक्त संस्था नाही, ती एक संस्कृती आहे!'... हा विचार जनमानसांत रुजवणारे कै. वैकुंठभाई मेहता यांची जयंती नुकतीच, २६ ऑक्टोबर रोजी झाली. आज बऱ्याचशा सहकारी संस्था राजकीय विळख्यात सापडल्याचे चित्र असताना, 'सहकाराच्या आत्म्यात नैतिकता नसेल, तर ती चळवळ नाही फक्त व्यवहार आहे' असा विचार मांडणारे आणि सहकारामध्ये समाजाच्या नैतिक शक्तीचे प्रतिबिंब पाहणारे वैकुंठभाई यांना विनम्र अभिवादन! या अशा काळात तर त्यांचे स्मरण होणे अनिवार्यच म्हणावे लागेल.

गुजरातमधील भावनगर येथे २६ ऑक्टोबर १८९१ रोजी वैकुंठभाईंचा जन्म झाला. मात्र त्यांचे माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण महाराष्ट्रात-मुंबईत झाले. जन्म गुजरातचा असला तरी महाराष्ट्र हीच त्यांची कर्मभूमी होती, असेच म्हणावे लागेल. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या उभारणीमधील त्यांचे योगदान. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे तीन प्रमुख आधारस्तंभ म्हणजे डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील आणि वैकुंठभाई मेहता. महाराष्ट्रातील सहकाराला खऱ्या अर्थाने दिशा, दृष्टी आणि दृढता देण्याचे काम या दिग्गज त्रयीने केले.

तो काळ होता सन १९३०चा. महाराष्ट्राच्या दख्खनच्या पठारावर उसाची हिरवीगार शेते डोलत होती. पाहणाऱ्याचे मन हरखून जाईल, अशी ती शेते. पण त्या मातीतून पिकणाऱ्या संपत्तीचा खरा मालक शेतकरी नव्हता. गावात सावकार होता आणि शहरात खासगी कारखानदार. शेतकरी राबायचा, ऊस पिकवायचा; पण बाजारात गेल्यावर मालाचे भाव खासगी मालकाच्या हातात. तो ठरवेल तो भाव. या अन्यायातून, याच मातीच्या आक्रोशातून, नियतीने महाराष्ट्राच्या सहकार क्रांतीसाठी तीन महान व्यक्तिमत्त्वांची निवड केली. हे तीन तारे होते... वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजय गाडगीळ आणि विठ्ठलराव विखे पाटील.

**भूमिपुत्र आणि संघर्षाची मशाल**

अहमदनगर जिल्ह्यातील लोणी गावचे विठ्ठलराव विखे पाटील (१९०१–१९८१). त्यांच्याकडे मोठी पदवी नव्हती, पण शेतकऱ्यांच्या दुःखाची खोलवर जाणीव त्यांना होती. त्या वेदनांचे भान त्यांना होते. त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले होते की, ऊस पिकवून गूळ करणे परवडत नाही आणि खासगी कारखानदारांना विकल्यास भाव मिळत नाही. विठ्ठलरावांना जाणीव झाली की, या शोषणातून मुक्ती मिळवायची असेल, तर शेतकऱ्याला केवळ कच्चा माल पिकवणारा नव्हे, तर पक्का माल बनवणाऱ्या कारखान्याचा मालक बनावे लागेल! त्याखेरीज तरणोपाय नाही. असा काही विचार करणे, अशी कल्पना करणे म्हणजे त्या काळात वेडेपणा होता. पण विठ्ठलरावांनी १९२३मध्ये पहिली सहकारी पतसंस्था स्थापन करून सहकाराच्या दिशेने पहिले पाऊल टाकले.

विठ्ठलरावांकडे संघर्ष करण्याची ऊर्जा होती, पण यासाठी नियोजन आणि अर्थकौशल्य या बाबी देखील तितक्याच महत्त्वाच्या होत्या. येथेच डॉ. धनंजय रामचन्द्र गाडगीळ (१९०१–१९७१) यांचा प्रवेश झाला. नाशिकमध्ये जन्मलेले गाडगीळ हे केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदवी घेऊन आले होते. त्यांच्याकडे आय.सी.एस. अधिकारी बनण्याची मोठी संधी होती, पण त्यांनी ती नाकारली. सन १९३० मध्ये त्यांनी पुण्यात गोखले अर्थशास्त्र संस्थेची स्थापना केली. गाडगीळ हे केवळ पुस्तकी पंडित नव्हते. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या समस्यांवर सखोल संशोधन करत राहिले. विठ्ठलराव हे त्यांनी मांडलेले सहकारी साखर कारखान्याचे स्वप्न घेऊन जेव्हा गाडगीळ यांच्याकडे गेले, तेव्हा गाडगीळ यांनी त्या स्वप्नाला 'व्यवसायाच्या गणिताचा' आधार दिला. त्यांनी सविस्तर व्यवहार्यता अहवाल (फिजीबिलिटी रिपोर्ट) आणि तांत्रिक मार्गदर्शन पुरवले. शेतकऱ्यांचा कारखाना खासगी कारखानदारांशी स्पर्धा करू शकतो आणि यशस्वी होऊ शकतो, हे त्यातून सिद्ध झाले. गाडगीळ हे धोरणकर्ते होते. त्यांनी एका कार्यकर्त्यांच्या स्वप्नाला शास्त्रीय नियोजन आणि व्यावसायिक सत्यतेचा भक्कम आधार दिला.

**विश्वासाचा अर्थ-शिल्पकार**

विठ्ठलराव विखे पाटील यांच्याकडे लोक होते. धनंजय गाडगीळ यांच्याकडे योजना होती, पण मोठा कारखाना उभा करायचा तर कोट्यवधी रुपयांचे भांडवल लागणार. हे कोट्यवधी रुपयांचे भांडवल कोण देणार, असा प्रश्न होता. येथे तिसरे आधारस्तंभ उभे राहिले, ते म्हणजे वैकुंठभाई मेहता (१८९१–१९६४). सहकार चळवळीचे भीष्माचार्य असलेले विठ्ठलराव हे बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे (महाराष्ट्र राज्य सहकारी बँक) सलग ३५ वर्षे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. वैकुंठभाईंची नैतिकता वादातीत होती. गांधीजींच्या खादी चळवळीतील ते अतिशय विश्वासू व मोलाचे सहकारी होते. ते नेहमी म्हणायचे: 'सहकारी प्रशिक्षण ही केवळ पूर्वअट नाही, तर सहकारी कार्याची कायमस्वरूपी अट आहे.'

जेव्हा विठ्ठलराव विखे पाटील हे डॉ. धनंजय गाडगीळ यांचे नियोजन घेऊन बँक ऑफ इंडियात गेले, तेव्हा खासगी बँकांनी, 'शेतकऱ्यांना साखर कारखाना चालवता येणार नाही' म्हणून त्या योजनेस पैसा देण्यास नकार दिला. पण वैकुंठभाई मेहता यांनी, बँकेचे प्रमुख आणि नंतर बॉम्बे राज्याचे अर्थ आणि सहकार मंत्री म्हणून, विठ्ठलरावांच्या स्वप्नाला पाठिंबा दिला, बळ दिले. मेहता यांच्या या प्रशासकीय धाडसामुळे आणि नैतिक विश्वासाच्या जोरावर, या प्रकल्पाला आवश्यक असलेले संस्थात्मक कर्ज मिळाले. मेहता यांचे हे पाऊल म्हणजे केवळ कर्ज देणे इतक्यापुरते सीमित नव्हते. ग्रामीण जनतेच्या आत्मविश्वासावर आणि सहकाराच्या तत्त्वज्ञानावर ठेवलेला तो राजकीय व वित्तीय विश्वास होता.

सन १९४८मध्ये ही त्रयी एकत्र आली आणि आशियातील पहिल्या औद्योगिक सहकारी संस्थेची स्थापना झाली. ती संस्था म्हणजे प्रवरा सहकारी साखर कारखाना. सन १९५०मध्ये कारखान्यातून साखरेचे उत्पादन सुरू झाले. विठ्ठलराव विखे पाटील यांनी शेतकऱ्यांचे संघटन केले. डॉ. गाडगीळ यांनी कारखान्याचे व्यवस्थापन आणि अर्थशास्त्र सिद्ध केले. आणि वैकुंठभाई मेहता यांनी त्याला वित्तीय बळ दिले. या कारखान्याच्या यशाने ऊस उत्पादकांचे, शेतकऱ्यांचे दीर्घ काळापासून सुरू असलेले शोषण थांबवले. या कारखान्यातून आलेला नफा पुन्हा समाजात गुंतवला गेला. सहकारी कारखाना हा फक्त पैसा कमवण्याचा कारखाना न राहता, तो सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीचे माध्यम झाला. या त्रयीने महाराष्ट्राला केवळ 'सहकार' दिला नाही, तर ग्रामीण विकासाचे एक मॉडेल दिले, जे आज गुजरात, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांसाठी प्रेरणास्रोत ठरले आहे.

विठ्ठलराव विखे पाटील यांची निःस्वार्थ सेवा, डॉ. गाडगीळ यांचे बुद्धिमत्तेचे नियोजन आणि वैकुंठभाई मेहता यांची नैतिक शिस्त हाच महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा त्रिवेणी संगम आहे. आजही पुण्यातील 'वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था' ही त्यांच्या शिक्षणाच्या तत्त्वज्ञानाचा वारसा घेऊन उभी आहे. नैतिकतेचा आधार असेल, नियोजनाची दिशा असेल आणि संघर्षाची तयारी असेल, तर इच्छाशक्तीच्या जोरावर सर्व काही शक्य आहे, हे या त्रयीने सिद्ध करून दाखवले. त्यापासून आजच्या काळात बोध घेण्याची गरज आहे.

**(लेखिका 'इंदिरामाई फडणीस सामाजिक प्रतिष्ठान'च्या संस्थापक आहेत.)**

# 'एसआयआर'च्या भीतीने ज्येष्ठाची आत्महत्या?

**कुटुंबीयांचा आरोप; पश्चिम बंगालमधील घटना**



वृत्तसंस्था, कोलकाता

पश्चिम मेदिनीपूर जिल्ह्यातील एका वृद्धाने मतदारयाद्यांच्या विशेष पडताळणीच्या (एसआयआर) भीतीतून आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. ही घटना बुधवारी रात्री बिरभूम जिल्ह्यातील इलांबाजार भागात घडली.

गेल्या ७२ तासांत ही अशा प्रकारची दुसरी घटना आहे. यापूर्वी कोलकात्याजवळील पाणिहाटी येथे अशीच आत्महत्येची घटना घडली होती. दरम्यान, कुछबिहारमधील एका शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न केला असून तो सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे. मृत व्यक्तीची ओळख क्षितीश मजूमदार अशी असून तो आपल्या मुलीच्या घरी राहत होता. बुधवारी रात्री तो गळफास घेतलेल्या अवस्थेत सापडला. त्याचा मृतदेहाचा शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

'मजूमदार यांना २००२ च्या मतदारयादीत आपले नाव नसल्याचे समजल्यापासून ते अत्यंत चिंतेत होते. ते वारंवार म्हणायचे, माझे नाव २००२च्या मतदार यादीत नाही, मग मला पुन्हा बांगलादेशात जावे लागणार का?', असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. पोलिसांनी या घटनेचा नैसर्गिक मृत्यू म्हणून गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

**पाणिहाटीतील आत्महत्येनंतर तृणमूलचा मोर्चा**

पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील पाणिहाटी येथे ५७ वर्षीय व्यक्तीच्या आत्महत्येच्या घटनेवर गुरुवारी तृणमूल काँग्रेसने निदर्शने केली. मृत व्यक्तीने राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) आणि मतदार यादीच्या विशेष पडताळणी प्रक्रियेबाबतच्या चिंतेतून आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. मृत व्यक्तीची ओळख प्रदीप कर अशी असून मंगळवारी (२८ ऑक्टोबर) तो आपल्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. त्याच्या शेजारी मिळालेल्या हस्तलिखित चिठ्ठीत त्याने दस्तऐवजांतील त्रुटीमुळे मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची भीती व्यक्त केली होती.

**मतदारयादीत 'फेरफार'**

तृणमूलचे प्रवक्ते कुनाल घोष यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, '२००२ च्या मतदारयाद्या आणि आणि आयोगाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेल्या याद्यांत प्रचंड तफावत आहे. हे भाजप व निवडणूक आयोगाच्या पूर्वनियोजित कटाचे परिणाम आहेत. एका भागात २००२ मध्ये ७१७ मतदार होते, पण आता फक्त १४० दाखवले आहेत. एवढ्या लोकांचा एकाच वेळी मृत्यू होणे शक्य नाही. ही सर्व नियोजित कारवाई आहे.' भाजपच्या कार्यालयांतून हा कट रचला गेला आणि आयोगाच्या माध्यमातून अंमलात आणला जात असल्याचा आरोपही घोष यांनी केला.

# बलुचिस्तानमध्ये १८ दहशतवादी ठार

वृत्तसंस्था, क्वेट्टा

पाकिस्तानच्या सुरक्षा दलांनी बलुचिस्तान प्रांतात केलेल्या कारवाईत (आयबीओ) १८ दहशतवादी ठार झाले. गुप्तचर खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, क्वेटा जिल्ह्यातील चिल्तान पर्वत रांगेत आणि केच जिल्ह्यातील बुलेडा येथे बुधवारी रात्री ही कारवाई करण्यात आली.

दहशतवादी लपलेले असताना सुरक्षा दलांनी त्यांना घेरले. तेव्हा दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या धुमश्चक्रीत चिल्तानमध्ये १४, तर केचमध्ये चार दहशतवादी ठार झाले. या दहशतवाद्यांकडून शस्त्रे, दारूगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली. परिसरात दडून बसलेल्या उर्वरित दहशतवाद्यांना संपवण्यासाठी आणखी कारवाया करण्यात आल्या.

# जमिनीच्या वादातून 'आय लव्ह मोहम्मद'

वृत्तसंस्था, अलिगड

अलिगडमधील दोन गावांतील अनेक मंदिरावर 'आय लव्ह मोहम्मद' असे रंगवण्याच्या घटनेला गुरुवारी वेगळेच वळण मिळाले असून, जमिनीच्या वादातून प्रतिस्पर्धी गटाला अडकवण्यासाठी हा प्रकार घडवण्यात आल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात चौघांना अटक करण्यात आली आहे.

भगवानपूर आणि बुलाकीगड गावामध्ये शनिवारी (२५ ऑक्टोबर) हा प्रकार घडला होता. घटनेला जातीय वळण देऊन प्रतिस्पर्ध्यांवर त्याचा दोष ढकलण्यासाठी हा प्रकार करण्यात आला. या प्रकरणात दिलीपकुमार, आकाश, अभिषेक सारस्वत आणि निशांतकुमार या चौघांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती अलिगडचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक नीरजकुमार यांनी दिली. या घटनेतील मुख्य सूत्रधार राहुल हा फरारी आहे.

जमिनीच्या दोन वादातून हा प्रकार घडला. यात चार कुटुंबांचा समावेश आहे. पहिल्या प्रकरणात राहुल याचा गुल मोहम्मद यांच्या कुटुंबाशी जमिनीचा वाद होता. त्यातून गेल्या वर्षी चकमकही उडाली होती. दुसरा वाद मुस्तकिम कुटुंबाचा निशांतकुमार याच्या कुटुंबाशी होता, असे सांगून नीरजकुमार म्हणाले, की २५ ऑक्टोबरला दोन्ही गावांत मंदिरावर 'आय लव्ह मोहम्मद' लिहिल्याचे आढळले. त्यामुळे गावात तणाव निर्माण झाला. यानंतर आरोपींनी मुस्तकिम, गुल मोहम्मद आणि अन्य पाच जणांविरुद्ध मंदिराची विटंबना केल्याची तक्रार दिली. तपासात राहुल आणि निशांतकुमार याच्या कुटुंबीयांनी गेल्या आठवड्यात एकत्रपणे प्रतिस्पर्धी कुटुंबीयांना अडकविण्याचा कट रचला आणि मंदिरावर ग्राफिटी केल्याचे निष्पन्न झाले.

# पटेल यांच्या जयंतीनिमित्त 'भारतपर्व'

**1 ते 15 नोव्हेंबरदरम्यान आयोजन; 31 ऑक्टोबरला विशेष परेड**



वृत्तसंस्था, पाटणा

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त १ ते १५ नोव्हेंबरदरम्यान 'भारत पर्व २०२५' साजरे करण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी दिली. दरवर्षी ३१ ऑक्टोबरला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त गुजरातमधील एकतानगर येथे नवी दिल्लीतील प्रजासत्ताक दिनाच्या धर्तीवर भव्य परेड आयोजित केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

१५ नोव्हेंबरला क्रांतिकारी आदिवासी नेते बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' येथे भव्य उत्सवाचे आयोजन केले जाईल. येथे पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि कला यांतील विविधतेसह आदिवासी संस्कृतीचा सोहळा होईल, असे शहा यांनी सांगितले. तर, 'भारताचे लोहपुरुष आणि अखंड भारताचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांची १५०वी जयंती ३१ ऑक्टोबरला एकतानगर येथील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' येथे साजरी केली जाईल, असे ते म्हणाले.

'यावर्षी राष्ट्रीय एकता दिनाचा भव्य उत्सव आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये विशेष कार्यक्रमांचा समावेश आहे. नवी दिल्लीत दरवर्षी २६ जानेवारीला होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडच्या धर्तीवर दरवर्षी ३१ ऑक्टोबरला एकतानगर येथे भव्य परेड आयोजित केली जाईल. यंदा पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी सकाळी ७.५५ वाजता पहिल्या परेडमध्ये सहभागी होतील', असे शहा म्हणाले. 'एकतानगर येथील परेडमध्ये विविध राज्य पोलिस दलांसह केंद्रीय निमलष्करी दलांच्या तुकड्यांचा समावेश असेल', असे त्यांनी सांगितले.


## भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

Bharat Petroleum · Shaping The Future

नोंदणीकृत कार्यालय: भारत भवन, 4 आणि 6, करिमभॉय रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–400 001
फोन: 022-2271 3000/4000
ईमेल: info@bharatpetroleum.in वेबसाइट: www.bharatpetroleum.in
सीआयएन: L23220MH1952GOI008931

**भौतिक समभागांच्या हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करण्यासाठी विशेष विंडो**

9 जुलै 2025 रोजीच्या आमच्या सूचनेनुसार, येथे सूचना देण्यात येत आहे की, 2 जुलै 2025 रोजीच्या सेबीच्या परिपत्रकानुसार, कंपनीने 1 एप्रिल 2019 च्या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या आणि कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेत/किंवा इतर कारणांमुळे नाकारलेल्या/परत केलेल्या/उपस्थित न राहिलेल्या हस्तांतरण करारांच्या पुनर्लेखनासाठी एक विशेष विंडो उघडली आहे. ही विशेष विंडो 6 जानेवारी 2026 पर्यंत सक्रिय राहील आणि अशा सर्व हस्तांतरणांची प्रक्रिया फक्त डीमॅट पद्धतीने केली जाईल.

गुंतवणूकदार त्यांची विनंती आमच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ("RTA") कडे, मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट 31 आणि 32, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद – 500 032 ; टोल फ्री क्रमांक: 1800 309 4001 ; ईमेल: einward.ris@kfintech.com येथे 6 जानेवारी 2026 पर्यंत सादर करू शकतात. गुंतवणूकदारांकडे डीमॅट खाते असणे आवश्यक आहे आणि त्यांनी आरटीएकडे हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करताना त्यांची क्लायंट मास्टर लिस्ट, हस्तांतरण कागदपत्रे आणि शेअर प्रमाणपत्र प्रदान करणे आवश्यक आहे. अशा हस्तांतरण-सह-डीमॅट विनंतीसाठी योग्य देय प्रक्रियेचे पालन केले जाईल. कायदेशीररित्या वैध आणि पूर्ण कागदपत्रांसह जिथे मालकी हक्कावर कोणताही वाद नाही, अशा सर्व पुन्हा दाखल केलेल्या अर्जांचा विचार केला जाईल.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड साठी
सही/-
(वी. कला)
कंपनी सचिव

तारीख: 30.10.2025
ठिकाण: मुंबई

Bharatgas · MAK LUBRICANTS · Bharat Petroleum Aviation Service
Energising Lives, Energising Naya Bharat



## भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ
SEBI
## भरती - २०२५

**अधिकारी श्रेणी अ - सामान्य, कायदेशीर, माहिती तंत्रज्ञान, संशोधन, अभियांत्रिकी (विद्युत), अभियांत्रिकी (नागरी) आणि अधिकृत भाषा प्रवाह च्या पदांसाठी अर्ज**

भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ (सेबी) ही संसदेच्या कायद्याद्वारे स्थापन केलेली एक वैधानिक संस्था आहे ज्याचा उद्देश सिक्युरिटीजमधील गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करणे, सिक्युरिटीज मार्केटच्या विकासाला चालना देणे आणि त्याचे नियमन करणे आहे. सेबी भारतीय नागरिकांकडून श्रेणी अ - सामान्य, कायदेशीर, माहिती तंत्रज्ञान, संशोधन, अभियांत्रिकी (विद्युत), अभियांत्रिकी (स्थापत्य) आणि अधिकृत भाषा प्रवाहात अधिकारी पदाच्या भरतीसाठी अर्ज मागवत आहे.

**अर्ज ३० ऑक्टोबर २०२५ ते २८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाइन** भरता येतील.

सविस्तर जाहिरात आणि ऑनलाइन अर्ज फॉर्मसाठी, सेबीच्या वेबसाइटला भेट द्याः https://www.sebi.gov.in/sebiweb/about/AboutAction.do?doVacancies=yes.

सीबीसी १५२०४/११/०१७५/२५२६



## बृहन्मुंबई महानगरपालिका

मध्यवर्ती खरेदी विभाग
औषधे निविदा विभाग, मुंबई–४०००११

**ई-प्रापण निविदा सूचना**

क्र. मखवि/उप अधिष्ठाता/जाहिरात/ओडी/२९७ दि.३०.१०.२०२५

| | |
|---|---|
| विभाग | उप अधिष्ठाता यांचे कार्यालय<br>**औषधे निविदा विभाग**<br>५६६, एन.एम. जोशी मार्ग, भायखळा (प), मुंबई–४०००११ |
| विभाग | औषधे निविदा विभाग |
| निविदा क्रमांक | शेड्युल 1-2025_MCGM_1234896<br>शेड्युल 2-2025_MCGM_1234905<br>शेड्युल 3-2025_MCGM_1234910 |
| विषय | औषध शेड्युल क्र. १ (निविदेनुसार)– इंजेक्शन व सेरा व्हॅक्सिनचा पुरवठा<br>औषध शेड्युल क्र. २ (निविदेनुसार)– टॅब्लेट व कॅप्सूलचा पुरवठा<br>औषध शेड्युल क्र. ३ (निविदेनुसार)– क्रीम्स ड्रॉप्स ऑइंटमेंट्सचा पुरवठा |
| निविदा दिनांक | प्रारंभ दिनांक ३१.१०.२०२५ पासून<br>समाप्ती दिनांक २०.११.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत. |
| संकेतस्थळ | **http://mahatenders.gov.in**<br>**टीप:** निविदेत काही बदल असल्यास कृपया एमसीजीएम पोर्टलवर अपलोड केलेल्या शुद्धीपत्रकाचा संदर्भ घ्यावा. |
| संपर्क व्यक्ती | **नाव:** डॉ. मनिषा मेस्त्री<br>उप अधिष्ठाता (म.ख.वि.)<br>**थेट क्र.** (०२२) २३०८ ३१६१/६२ /६३ |

PRO/2065/ADV/2025-26

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशानुसार
सही/-
उप अधिष्ठाता (मखवि)

जलजन्य आजार टाळण्यासाठी पाणी गाळून व उकळून प्यावे.